Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी
शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-Mail- secretary .stateboard @ gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : STD . (020)- 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-८/१९६८
पुणे-४११००४
दि.-२/०३/२०२१

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२० श्रेणीसुधार परीक्षेची गुणपत्रिका मिळण्यासाठी विकल्प सादर करण्यास मुदतवाढ मिळणेबाबत...

संदर्भ- शासनाचे क्र.परीक्षा-०३२१/प्र.क्र.३०/एस.डी.२ दि.३१/०३/२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षेस श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना काही अपरिहार्य कारणास्तव सहा महिन्याच्या कालावधीत विकल्प सादर करु शकलेले नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी केवळ सन २०२०-२१ या वर्षासाठी खास बाब म्हणून विकल्प सादर करण्यास शासनाने दि.३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदर शासनाने दिलेल्या मुदतवाढीनुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षेस श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांबाबत पुढील उचित कार्यवाही करावी. सदरच्या सूचना सर्व संबंधितांचे निदर्शनास आणून प्रसिध्दी देण्यात यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ,पुणे

---

क्र.कोविमं/इ.१२वी परीक्षा/ 48
कोल्हापूर ४१६००४
दिनांक ०५/०४/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सांगली,सातारा,कोल्हापूर.

इयत्ता १२वी फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षेसाठी श्रेणीसुधार योजने अंतर्गत प्रविष्ठ विद्यार्थ्यांना विकल्प सादर करणे तथा गुणपत्रिका मिळणेसाठी शासनाने खास बाब म्हणून दि.३०/०४/२०२१ अखेर मुदतवाढ दिलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००५.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२० श्रेणीसुधार परीक्षेची गुणपत्रिका मिळण्यासाठी विकल्प सादर करण्यास देण्यात येणाऱ्या मुदतवाढीबाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, दि.०६/०५/२०१३ शासन पत्रानुसार निकाल जाहीर झाल्यानंतर श्रेणी सुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी विकल्प सादर करुन सुधारित गुणपत्रिकेची मागणी केल्यास सुधारित गुणपत्रिका बदलून देण्याचा कालावधी एक महिन्याऐवजी सहा महिन्यापर्यंत वाढविण्यात आलेला होता.

तथापि, शासनाच्या दि.३१/०३/२०२१ च्या पत्रान्वये राज्यातील कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी-मार्च २०२० उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेले विद्यार्थी काही अपरिहार्य कारणास्तव सहा महिन्याच्या कालावधीत विकल्प सादर करु शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी केवळ सन २०२०-२१ या वर्षासाठी खास बाब म्हणून विकल्प सादर करण्यास दि.३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी )परीक्षेसाठी श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेले विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक / प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयांशी व विभागीय मंडळांशी संपर्क साधून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक ०५/०४/२०२१